-

## विशेष दिवाणी दावा क्र. २०/२०२२ मधील निशाणी क्र.७३ वरील आदेश

अर्ज वाचून पाहिला. प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी प्रतिवादी क्र. १९ रब्बानी गनी कुरेशी हया दिनांक ०३/०५/२०२४ रोजी मयत झाले असल्याने त्यांचे कायदेशीर प्रतिनिधी दाव्यामध्ये सामील करण्याबाबत दाखल केलेला आहे.

**०२.** वादीतर्फे अर्जात असे नमूद करण्यात आले की, प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी क्र. १९ रब्बानी गनी कुरेशी ह्या दिनांक ०३/०५/२०२४ रोजी मयत झालेले आहेत व त्यांना ख्वाजा गनी कुरेशी व अजीम गनी कुरेशी असे कायदेशीर प्रतिनिधी आहेत व त्यांच्या व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत, सबब मयत प्रतिवादी क्र. १९ चे कायदेशीर प्रतिनिधीचे नाव दाव्यात समाविष्ट करण्याची परवानगी देण्यात यावी अशी विनंती करण्यात आलेली आहे.

**०३.** प्रस्तुत अर्जास प्रतिवादी क्र. १ ते १३ यांचेतर्फे म्हणणे दाखल करुन विरोध दर्शविणेत आलेला आहे. तर इतर प्रतिवादींना संधी देवून देखील सदर अर्जावर म्हणणे दाखल केलेले नाही. तसेच प्रस्तावित वारसांना नोटीसा बजावणी झाले असताना देखील प्रस्तावित वारसांनी हजर होवून प्रस्तुत अर्जावर कसलेही म्हणणे दाखल केलेले नाही.

**०४.** वादीतर्फे विदवान विधिज्ञ ***श्री.एम.एम.पत्की*** यांचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादी क्र. १ ते १३ तर्फे विदवान विधिज्ञ ***श्री.एस.जी.चिखलीकर*** यांचा युक्तीवाद ऐकला.

**०५.** वादीतर्फे अर्जाचे पृष्ठार्थ मयत प्रतिवादीचे मृत्यू प्रमाणपत्र दाखल करण्यात आलेले आहे. प्रस्तुत दावा हा वाटप होवून पृथक कब्जा मिळणेकरीता व ठरावाकरीता दाखल करण्यात आलेला आहे. एकंदरीत दाव्याचे स्वरुप, दाव्यातील वाद विचारात घेता दाव्यास असलेले कारण हे मयत प्रतिवादी क्र.१९ चे कायदेशीर प्रतिनिधीविरुध्द देखील अस्तित्वात राहते. तेव्हा अशा परिस्थितीत दाव्यात योग्यप्रकारे, परिणामकारक निर्णय

होण्याकरीता तसेच यदाकदाचित दाव्यात होणा–या हुकूमनाम्याच्या योग्य अंमलबजावणीकरीता मयत प्रतिवादीचे कायदेशीर प्रतिनिधी अभिलेखावर येणे न्यायाच्या दृष्टीकोनातून आवश्यक आहे. वादीतर्फे शपथेवर मयत प्रतिवादी क्र. १९ रब्बानी गनी कुरेशी यांना ख्वाजा गनी कुरेशी व अजीम गनी कुरेशी हेच एकमेव कायदेशीर वारस असल्याचे नमूद करण्यात आलेले आहे व सदर कथन नाकारण्याचे कोणतेही कारण अभिलेखावर नाही. एकंदरीत दाव्याचे स्वरुप, वादी व प्रतिवादीमधील वादाचे स्वरुप, दावा स्थावर मिळकतीशी संबंधीत असल्याची बाब, तसेच दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २२, नियम १,२ व ४ अन्वये प्रतिवादी क्र.१९ रब्बानी गनी कुरेशी यांचे मृत्यूपश्चात त्यांच्या कायदेशीर प्रतिनिधीविरुध्द दाव्याचे कारण अस्तित्वात राहत असल्याची बाब विचारात घेता, मयत प्रतिवादी क्र.१९ चे कायदेशीर प्रतिनिधी अभिलेखावर येणे आवश्यक आहे. प्रस्तुत अर्ज दाखल करण्यास झालेला विलंब व यदाकदाचित झालेला अबेटमेंटचा आदेश याबाबतचे वादीचे अर्ज मंजूर करण्यात आलेले आहेत. सबब वर नमुद कारणे प्रस्तुत अर्ज मंजूर करणे न्याययोग्य आहे. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

| | |
|---|---|
| १) | निशाणी क्र.७३ वरील अर्ज मंजूर करणेत येत आहे. |
| २) | वादीस,मयत प्रतिवादी क्र. प्रतिवादी क्र. १९ रब्बानी गनी कुरेशी यांचे अर्जात नमुद केल्याप्रमाणे कायदेशीर प्रतिनिधी अभिलेखावर घेणेची परवानगी देण्यात येते. वादीस दाव्यात त्या अनुषंगे दुरुस्ती करणेची देखील परवानगी देण्यात येते. वादीने प्रस्तुत दुरुस्ती ही पुढील तारखेपासून १४ दिवसांचे आत करावी व दुरुस्ती दाव्याच्या प्रती न्यायालयात तात्काळ दाखल कराव्यात. |
| | "दावा येणेप्रमाणे पुढे चालेल.'' |

Digitally signed by SONTAKKE MAHAVIR BALIRAM
Date: 2025.09.29 13:32:55 +0530

(एम.बी.सोनटक्के),
२रे सह दिवाणी न्यायाधीश (व.स्तर),
अंबाजोगाई.

दिनांक –२९/०९/२०२५